पुढारी



# कोल्हापूरच्या फोटोग्राफरला राज्यस्तरीय विशेष पारितोषिक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतातील शेतीचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने ऑनलाईन चालविल्या जाणाऱ्या 'टॅफे फार्म दोस्त' यांच्यामार्फत आयोजित देशव्यापी फोटोग्राफी स्पर्धेत स्पेशल कॅटेगरीमध्ये कोल्हापुरातील हौशी फोटोग्राफर विशाल गुडूळकर (रा. रुईकर कॉलनी) यांच्या फोटोला विशेष पुरस्काराने गौरवण्यात आले.

स्पर्धेत हजारो छायाचित्रकार सहभागी झाले होते. यातून निवडक ७५० छायाचित्रे व व्हिडीओंची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे फोटो व व्हिडीओ कॅटेगरीमध्ये पहिल्या नंबरवर महाराष्ट्रातील स्पर्धकांनी बाजी मारली. विशाल गुडूळकर यांचे मूळ गाव किणे (ता. आजरा) आहे. याच गावातील शेतकरी बाबू कांबळे व त्यांच्या बैलांचा फोटो गुडूळकर यांनी टिपला होता.

Kolhapur Edition
Dec 27, 2021 Page No. 9
newspaper.pudhari.co.in